# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:17.05.2026** **वार: रविवार**

**ठळक बातम्या**

- जागतिक स्तरावर भारताची भूमिका वृद्धिंगत होत असताना भारत नव्या संधींचं प्रवेशद्वार होत असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन.
- जनगणना 2026 च्या दुसऱ्या टप्प्यात, घरयादी आणि घरमोजणी प्रक्रियेला कालपासून राज्यात प्रारंभ.
- नीट प्रश्नपत्रिका फुटल्याप्रकरणी, सीबीआयकडून काल पुण्यात आणखी एका मुख्य सूत्रधार महिलेला अटक.
- गडचिरोलीत ऑपरेशन अंतिम प्रहार मोहिमेअंतर्गत 8 नक्षलवाद्यांना अटक, पाच नक्षलवादी शरण. आणि
- आशियाई भारत्तोलन अजिंक्यपद स्पर्धेत, भारताच्या संजनाला तीन कास्यपदकं.

**<u>पंप्रदौरानेदरलँडस</u>**

आपत्ती आणि संकटांचं दशक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वर्तमान दशकात भारत आणि नेदरलँडस विश्वासार्ह, पारदर्शक आणि भविष्यवेधी पुरवठा साखळी तयार करण्यासाठी एकत्रित काम करत असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं.

पाच दिवसांच्या परदेश दौऱ्यात काल नेदरलँडस् इथल्या प्रवासी भारतीयांच्या कार्यक्रमात पंतप्रधान सहभागी झाले होते, त्यावेळी ते बोलत होते. वर्तमान जागतिक संघर्षाची परिस्थिती, उद्भवणारे ऊर्जा संकट यांसारख्या आव्हानांच्या साखळीला सामोरे जाण्यास अपयश आल्यास जागतिक पातळीवर लोकसंख्येचा मोठा भाग गरिबीत ढकलला जाऊ शकतो, असंही मोदी यावेळी म्हणाले. जागतिक स्तरावर भारताची भूमिका वृद्धिंगत होत असल्याचं सांगून पंतप्रधान म्हणाले...

21 वी सदी का भारत अवसरों की भूमी है. भारत टेक्नॉलॉजी ड्रिव्हन भी है.. और ह्युमिडिटी ड्रिव्हन भी है. भारत जितना एन्शंट है उतनाही मॉडन बन रहा है. और विकसित भारत की जर्नी में भागीदारीता भी है.. मै नेदरलँड मे भारतीय समुदाय के सभी साथियों से कहूंगा आप भारत मे ज्यादा से ज्यादा सहयोग बढाये इससे भारत का सामर्थ्य भी बढेगा और आपके इन्वेस्टमेंट पे ज्यादा रिटर्न भी ज्यादा मिलेगा ..

त्यानंतर पंतप्रधानांनी नेदरलँड्सचे राजे विलेम-अलेक्झांडर आणि राणी मॅक्झिमा यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान, नेदरलँडच्या लायडन विद्यापीठाकडून 11 व्या शतकातील चोळ ताम्रपट पंतप्रधानांना भेट देण्यात आले.

**<u>जनगणना</u>**

जनगणना 2026 च्या दुसऱ्या टप्प्यात, घरयादी आणि घरमोजणी प्रक्रियेला कालपासून राज्यात प्रारंभ झाला. केंद्र सरकारने निश्चित केलेले 33 प्रश्न यात विचारले जाणार आहेत. ही घरयादी आणि घरमोजणी प्रक्रिया महिनाभर सुरू राहाणार आहे. यामध्ये प्रगणक प्रत्येक घरी भेट देऊन घरातील स्थिती, सोयी-सुविधा आणि मालमत्तेशी निगडीत माहिती नोंदवून घेतील. स्वगणना प्रक्रिया पूर्ण केलेल्या नागरिकांनी आपला स्वयं-गणना ओळख क्रमांक द्यायचा आहे ज्यामुळे माहितीची पडताळणी करणे आणि संपूर्ण प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडणे सुलभ होईल.

या प्रक्रियेदरम्यान नोंदवण्यात येणाऱ्या माहितीची गोपनीयता राखली जाईल असं आश्वासन सरकारच्या वतीनं देण्यात आलं आहे.

**<u>पॉश</u>**

राज्यातल्या सरकारी, निमसरकारी आणि खासगी आस्थापनांमध्ये, कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ प्रतिबंध, मनाई आणि निवारण अधिनियम 2013 म्हणजेच पॉश कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्याचे निर्देश महिला आणि बाल विकास विभागानं दिले आहेत. या संदर्भात विभागानं एक परिपत्रक जारी केलं असून, विविध आस्थापनांची तपासणी करण्याचे कायदेशीर अधिकार संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहे. दहा किंवा त्यापेक्षा अधिक कर्मचारी कार्यरत आहेत, अशा आस्थापनांमध्ये अंतर्गत तक्रार निवारण समिती स्थापन करणं बंधनकारक आहे. यातील सदस्यांच्या नियुक्तीचे नियम पाळणंही आवश्यक आहे. तसंच महिलांना तक्रारीसाठी ई-मेल, लेखी अर्ज तसंच She-box पोर्टलसारखी माध्यमं उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही शासनानं दिल्याचं प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे. तपासणीदरम्यान पॉश कायद्याच्या तरतुदींचं पालन न झाल्याचं आढळल्यास संबंधित आस्थापनांवर कायद्याच्या कलम 26 नुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असंही नमूद करण्यात आलं आहे.

**<u>क्लायमेटअहवाल</u>**

हवामान बदलाच्या समस्येवर जागतिक पातळीवर चर्चा आणि प्रत्यक्ष कृती यांचा मेळ घालणाऱ्या मुंबई क्लायमेट वीकच्या पहिल्या पर्वाच्या निष्पत्ति आणि परिणामकारकता अहवालाचं प्रकाशन काल मुंबई मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आलं. क्लायमेट वीकच्या दुसऱ्या पर्वाचं आयोजन पुढील वर्षी फेब्रुवारीमध्ये करण्यात येणार असल्याची घोषणाही यावेळी करण्यात आली.

**<u>या प्रादेशिक बातम्या आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात.</u>**

बातमीपत्रात आपलं पुन्हा स्वागत.

**<u>नीट</u>**

नीट प्रश्नपत्रिका फुटल्याप्रकरणी, सीबीआयनं, काल पुण्यातून आणखी एका मुख्य सूत्रधार महिलेला अटक केली आहे. प्राध्यापक मनीषा मांढरे असं या संशयित आरोपीचं नाव असून, ती पुण्यातल्या एका महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र विषयाची शिक्षिका आहे. सीबीआयनं दिलेल्या माहितीनुसार एनटीएनं या प्रक्रियेत तिची तज्ज्ञ म्हणून नेमणूक केली होती. तर पुण्यातून 14 मे रोजी मनीषा वाघमारे हिलाही अटक करण्यात आली आहे. या दोन्ही आरोपींना काल पुणे न्यायालयात हजर करण्यात आल्यानंतर त्यांना दिल्लीला नेण्यात आलं आहे. सीबीआयनं देशभरातल्या सहा विविध ठिकाणी छापा टाकून झडती घेतली.

**<u>शिक्षणबैठक</u>**

देशात इयत्ता पहिलीच्या वर्गात प्रवेश घेणाऱ्या 100 मुलांपैकी केवळ 62 मुले इयत्ता बारावीपर्यंत पोहोचतात असं नियतकालिक रोजगार क्षमता सर्वेक्षणात आढळून आलं आहे. देशात 14 ते 18 वर्ष वयोगटातील दोन कोटींहून अधिक मुले शालाबाह्य आहेत, अशी माहिती शालेय शिक्षण आणि साक्षरता विभागाचे सचिव संजय कुमार यांनी काल दिली.

शालाबाह्य मुलांच्या समस्येवर विचारमंथन करणे आणि राष्ट्रीय मुक्त विद्यालय संस्थेच्या प्रस्तावित नवीन उपक्रमांच्या अंमलबजावणीसाठी धोरणांवर चर्चा करणे, या उद्देशानं काल दिल्लीत शालेय शिक्षण आणि साक्षरता विभागानं एका बैठकीचं आयोजन केलं होतं. आर्थिक अडचणी, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि उपजीविकेची आव्हानं या कारणांमुळे ही मुले शिक्षण व्यवस्थेबाहेर राहात असल्याचं त्यांनी नमूद केलं.

**<u>नागपूरमडगाव</u>**

नागपूर-मडगाव रेल्वे एक्सप्रेसला काल नागपूर रेल्वे स्थानकावरून केंद्रीय रस्ते आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवण्यात आला. आठवड्यातून दोन दिवस चालवण्यात येत असलेल्या या गाडीला. प्रवाशांचा 100 टक्के आणि सातत्यपूर्ण प्रतिसाद मिळत राहिला तर ही गाडी रोज चालवण्याचा प्रयत्न रेल्वे प्रशासन करेल, असं गडकरी यांनी

यावेळी सांगितलं. या गाडीला वर्धा, अकोला, भुसावळ, नाशिक रोड, पनवेल, रत्नागिरी, कणकवली, सावंतवाडी रोड आदी महत्त्वाच्या स्थानकांवर थांबा आहे.

**अॅग्रीहॅकेथॉन**

पुण्यात गेल्या वर्षी जून महिन्यामध्ये झालेल्या पुणे अॅग्री हॅकेथॉनमधील सोळा नाविन्यपूर्ण उत्पादनांपैकी निवड झालेल्या चार उत्पादनांना कृषी यांत्रिकीकरण योजनेत समाविष्ट करण्याची कार्यवाही राज्य सरकारमार्फत सुरू झाल्याची माहिती उपमुख्यमंत्री आणि पुण्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिली.

कृषी विभागाच्या वतीनं पुण्यातल्या कृषी महाविद्यालयाच्या आवारात दुसऱ्या पुणे अॅग्री हॅकॅथॉन-2026 स्पर्धेचं उद्घाटन पवार यांच्या हस्ते काल झालं. त्यावेळी त्या बोलत होत्या. या वर्षीच्या हॅकेथॉनमध्ये विविध राज्यातल्या सुमारे 1 हजार 300 स्पर्धकांनी तर राज्यातून 867 स्पर्धकांनी सहभाग घेतला आहे.

**नक्षलअटक**

गडचिरोली जिल्हा नक्षलमुक्त करण्यासाठी सुरू असलेल्या ऑपरेशन अंतिम प्रहार मोहिमेअंतर्गत काल 8 नक्षलवाद्यांना अटक करण्यात आली तर पाच नक्षलवादी पोलिसांसमोर शरण आले. अटक करण्यात आलेल्यांमध्ये कंपनी क्रमांक 10 चा विभागीय सदस्य राजू मंगू वेको आणि त्याची पत्नी जन्नी उर्फ नगी येमला तसंच इतर सहा कंपनी सदस्यांचा समावेश असल्याची माहिती पोलिस अधीक्षक एम.रमेश यांनी काल वार्ताहर परिषदेत दिली. या सर्वांकडून 65 लाख 34 हजार रुपये रोख रक्कम, एके-47, एसएलआर यासह अन्य बंदुका असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या सर्वांवर 64 लाख रुपयांचं बक्षीस होतं. त्याशिवाय, शरण आलेल्या पाच नक्षलवाद्यांवरही 38 लाख रुपयांचं बक्षीस जाहीर करण्यात आलं होतं. नक्षलवाद्यांना अटक आणि शरणागती यामुळे गडचिरोली जिल्हा नक्षलमुक्त झाल्याचं पोलिस अधीक्षक एम. रमेश यांनी सांगितलं.

**आशियाईभारत्तोलन**

गांधीनगर इथं सुरू असलेल्या आशियाई भारत्तोलन अजिंक्यपद स्पर्धेत, भारताच्या संजनानं 77 किलो वजनी गटात तीन कास्य पदकं पटकावली. स्नॅच, क्लीन अँड जर्क या प्रकारांमध्ये 220 किलो वजन उचलून तिनं तीन पदकं आपल्या नावे केली.

**हवामान**

मराठवाडा, कोकणात तुरळक ठिकाणी विजांसह वादळी पाऊस आणि सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. विदर्भात, उष्णतेची लाट येण्याचा अंदाज आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.